# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

जा.क्र./ गो.वि./म.वि.वि.वि./2332 /२०२२ दिनांक : 6 /०५/२०२२

## :: परिपत्रक ::

**विषय:–** राखीव निधी व ईमारत निधी जमा करण्याबाबत..

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्यापीठाचे संलग्निकरण देतांना महाविद्यालयास राखीव निधी व ईमारत निधीची रक्कम भरणे क्रमप्राप्त आहे. परंतु असे निदर्शनास आलेले आहे की, बऱ्याच महाविद्यालयांनी अद्यापही राखीव निधी व ईमारत निधीची रक्कम पूर्ण भरलेली नाही.

१) तथापी ज्या महाविद्यालयांनी राखीव निधी व ईमारत निधीची रक्कम भरणा केलेली नाही, अशा सर्व महाविद्यालयांनी दि. ३१/०५/२०२२ पर्यंत शिल्लक रक्कमेचा तातडीने भरणा करावा

२) ज्या महाविद्यालयांनी राखीव निधी व ईमारत निधीची संपूर्ण रक्कम भरणा केलेली आहे. अशा महाविद्यालयांनी पावतीसह विवरण दि. ३१/०५/२०२२ पर्यंत महाविद्यालय विभागास सादर करावे.

३) तसेच इमारत स्वत:ची असल्यास संबधित दस्ताऐवज सादर करावे.

सर्व संलग्नित महाविद्यालयांनी उक्त बाबीसंबंधी कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी. जी महाविद्यालये वरील मुद्यांचे अनुपालन करणार नाही. अशा महाविद्यालयांवर दंडात्मक कार्यवाही म्हणून त्यांचे महाविद्यालयीन विभागाशी संबंधित सर्व कार्ये स्थगित करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी ही संस्था व महाविद्यालयाचे प्राचार्य यांची राहील, याची नोंद घ्यावी.

अत्यावश्यक टिप :–शैक्षणिक सत्र २०१२–१३ पासून मान्यता प्राप्त नविन महाविद्यालयांनी तसेच शै. सत्र २०१२–१३ पुर्वीचे नागपूर विद्यापीठाकडून हस्तांतरीत झालेल्या महाविद्यालयांनी सुद्धा दोन्ही निधींचा भरणा केला असल्यास पावती व संबधीत दस्ताऐवजासह अहवाल सादर करावा.

मा. प्र–कुलगुरू यांच्या मान्यतेने,

( देवेंद्र एम. झाडे )
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहीतीस्तव :–

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
५. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.